





दैनिक

# सिंधुदुर्ग समाचार

ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग  मुंबई  www.sindhudurgsamachar.in  T-2/RNP/SDG-06/2024-2026

संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्रं. एमलव्ही /२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ | सोमवार, दिनांक ८ डिसेंबर २०२५ | ● पाने ४ ● वर्ष ४० ● अंक १३ ● किंमत ३ रु. ● सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, गोवा, मुंबई, पुणे







सूर्योदय: ०६ : ४८
सूर्यास्त: १८ : ००

**भरती / ओहोटी**
दु. ०२ : ०६ सायं.१३ : ५४
स. ०८ : २४ सायं. २० : ०३

**रत्नागिरी**
कमाल तापमान : ३२.०४
किमान तापमान : २०.०७

**मुंबई (सांताक्रूझ)**
कमाल तापमान : ३२.०५
किमान तापमान : २०.०३

**हवामान**
उत्तर कोकण : कोरडे
द. कोकण व गोवा : कोरडे

## मोंड खाडीवरचा पूल अजूनही फाईलमध्येच अडकलेला!

# जुनी कात्रणं पिवळी पडली...

**मोंड खाडीचा पुलाचा विषय आता जनतेला कंटाळवाणा नाही. तो जिव्हारी लागलेला आहे. १९७० पासून लोक ''होईल, होईल'' म्हणत वाट पाहत आहेत, पण सरकारचा फक्त शब्दांचा पाऊस आणि कागदांची धूळ. अर्धशतक उलटलं, पिढ्या बदलल्या... पण पूल मात्र अजून स्वप्नातच! नदी रोज ओलांडताना जीव थरथरतो, पण मंत्र्यांना आणि अधिकाऱ्यांना मात्र फाईल हलवायलाच वर्षे जातात. लोकांच्या त्रासाचं कोणालाच काहीच पडलेलं नाही, फक्त आश्वासनं आणि फोटोसेशन! प्रश्न अगदी सरळ आहे. पंचक्रोशीचे लोक किती दिवस फसणार? आणि सरकार अजून किती वर्षे पुलाला ''लवकरच'' या खोट्या शब्दात अडकवून ठेवणार?**

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

मोंड खाडीवरच्या पुलाची मागणी ही नुसती मागणी नाहीय पंचक्रोशीतील लोकांची अर्धशतकापासून चाललेली वेदना आहे. ३० जानेवारी १९७० च्या लोकसत्ताच्या कात्रणातही हीच तडफड दिसते. या वेळीही अधिकारी पाहणी करत होते, प्रस्ताव फिरत होते, आश्वासने दिली जात होती आणि जनता ''या वेळी तरी होईल'' म्हणून वाट पाहत होती. पण आज २०२५ आली, पिढ्या बदलल्या, कात्रणं पिवळी पडली, पण पुलाचे काम अजूनही परवानग्यांच्या आणि प्रस्तावांच्या दलदलीत अडकलेले आहे. आणि सरकारचा सूर मात्र तोच-''लवकरच होणार'', ''प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आहे'', ''बजेटमध्ये तरतूद करू'' ही गाणी ५५ वर्षे ऐकलेला जनताच आता कंटाळली आहे.

वानिवडे–मोंड खाडीवरील उंच पातळीचा पूल मंजूर झाला अशी घोषणा झाली तेव्हा लोकांनी क्षणभर दिलासा घेतला. पण लगेच नवा अडथळा कांदळवन तोडण्याची परवानगी. म्हणजे पुलाचं काम नाही, आधी फाईलचं काम! एकीकडे 'कोस्टल झोन', दुसरीकडे 'इको–परमिट', तिसरीकडे 'क्रोकोडाइल ऑब्झर्वेशन' या सगळ्यात पुलाच्या फाईलची पायपीट सुरूच आहे. गावकऱ्यांना मात्र सरकारच्या या विभागानं त्या विभागाकडे ढकलण्याच्या क्रिकेट मॅचीत रस उरलेला नाही. कारण त्यांना रोजच्या रोज जिवाला घोर होत नदी ओलांडावी लागते,


३० - १ - १९७०
मोंड नदीवरील पुलास अग्रक्रम मिळणार
राजा मिराशी यांच्या खटपटीस यश
(आमच्या प्रतिनिधीकडून)
मर्फी रेडिओची वाढती लोकप्रियता
(आमच्या प्रतिनिधीकडून)

शाळेत जाणारी मुलं धोका पत्करतात, आपत्कालीन प्रसंगी लोकांना तासन्तास बोट शोधावी लागते. पण सरकारनं जणू ठरवलं आहे. जनतेची समस्या बाजूला ठेवा, आधी फाईल्सची 'तपासणी' पूर्ण होऊ द्या!

पावणाई-तळवडे एकेरी पूल तर खरी योजना भटकंतीचा कळस आहे. २०१९/२० च्या योजनेत असलेला हा पूल २०२३/२४ वाढीव निधीत ढकलला गेला, आणि आता २०२५ आली तरी कामाचा पत्ता नाही. बाब म्हणजे हे काम लोकांसाठी नाही, तर कागदांसाठी चालू आहे. योजना विभाग, रोखी परवानगी, निधी वितरण, तांत्रिक मंजुरी- कुठेच समन्वय नाही. आणि हे बघत–बघत लोकांच्या संयमाचा कडेलोट झाला आहे.

टेंबवला- मोंड–मोंडतर उंच पुलाचा प्रस्ताव तर पुढील अर्थसंकल्पात असं म्हणून पुढे ढकलण्यात आला आहे. हा शब्द पंचक्रोशीत आता विनोद झाला आहे. जसं सरकारला उत्तर द्यायचं नसतं, तसं ''पुढील अर्थसंकल्पात'' हा धोपट वाक्यप्रचार वापरला जातो. १९७० पासून पुलाचं काम 'या वर्षी', 'पुढच्या वर्षी', 'त्यापुढच्या वर्षी' या भ्रमजालात फिरत राहिलं, पण प्रत्यक्षात जमिनीवर खणलेली एक फावडीही पडलेली नाही.

वानिवडे, पावणाई, मोंड, मोंडपार, मळेगाव, टेंबवली, तळवडे या सगळ्या गावांनी दोन पिढ्या बदलल्या, पण सरकारची काम करण्याची गती मात्र १९७० च्या कात्रणात जशी होती तशीच आहे. पंचक्रोशीतला साधा मनुष्य आता प्रश्न विचारतो. आम्ही सरकारला काय पाप केलंय की ५५ वर्षे नदी ओलांडताना जीव मुठीत धरून जगतोय? लोकांनी आशा धरली, आंदोलने केली, मागण्या केल्या, पण राज्यकर्त्यांनी फक्त फोटो काढले, विधानसभेत आश्वासने दिली आणि फाईलला पुढचा व्हिसा लावला.

आज पुन्हा सांगितलं जातंय. पालकमंत्री अधिवेशनात तरतूद करतील. पंचक्रोशीतील लोकांची आता एकच मागणी आहे. वाऱ्यातले शब्द नकोत, फाईलचे बहाणे नकोत, पुलाची ठोस तारीख द्या. कारण जनतेचा प्रश्न साधा आहे. कात्रणं पिवळी पडली, पण पूल कधी उभा राहणार?

# बर्च नाईट क्लबमध्ये मृत्युचा सापळा!


## आत अडकलेल्या २५ जणांचा मृत्यू, ५० जखमी!

**पणजी । प्रतिनिधी**

**गोव्यासारख्या** स्वर्गसदृश पर्यटन राज्यात रविवारी मध्यरात्री घडलेली ही दुर्घटना म्हणजे अक्षरशः मृत्यूच नृत्य. अर्पोरामधील 'बर्च' या नाईट क्लब–कम– रेस्टॉरंटमध्ये अचानक उठलेल्या ज्वाळांनी क्षणात नरकाचे रूप धारण केले आणि उजाडत आलेल्या रात्रीचे अंधारात कित्येक कुटुंबांचे आयुष्य कायमचे जळून खाक केले. कोण कल्पनाही करू शकत नाही की आनंदाच्या नावाखाली चालणाऱ्या या क्लबमध्ये काही सेकंदांत अशी किंकाळ्यांनी भरलेली, धुराने दाटलेली, जीवघेणी रात्र उभी राहील. स्वयंपाकघरातील सिलिंडरचा स्फोट झाला आणि त्याठिकाणी साठवून ठेवलेल्या रसायनं व फटाक्यांनी ज्वाळांना असा विक्राळ वेग घेतला की, पळण्यासाठी उंबरठा ओलांडण्याचीही संधी अनेकांना मिळाली नाही. जे बाहेर पडण्यासाठी धडपडत होते तेही धुराने गुदमरून कोसळले.

या दुर्घटनेमुळे संपूर्ण देश हादरून गेला असून मृतांमध्ये झारखंड, आसाम, उत्तराखंड आणि नेपाळमधील तरुण कामगारांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. बहुतांश मृतदेह नाईट क्लबच्या स्वयंपाकघरात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे असून आग वेगाने पसरल्यामुळे त्यांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या आगीनं २५ निरपराधांचे प्राण घेतले. त्यात १९ तरुण कर्मचारी, जे आपापल्या घरच्या जबाबदाऱ्या उचलण्यासाठी, कष्ट करीत होते.. आणि चार पर्यटककृजे कदाचित फक्त एक सुंदर, आनंदी रात्र घालवायला आले होते. कित्येकांचे मृतदेह ओळखण्याच्या पलिकडे गेले आहेत. कित्येक जखमी GMC मध्ये मृत्यूशी झुंज देत आहेत. रडणारे नातेवाईक, हादरलेले पर्यटक, काळवंडलेली भिंत आणि फुटलेल्या काचा हे दृश्य एखाद्या युद्धानंतरच्या विध्वंसासारखे वाटत होते.

या भीषण आगीत झारखंडमधील



रांची येथील मोहित मुंडा (वय १८), प्रदीप महतो (२२) आणि बिनोद महतो (१९) या तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. याशिवाय आसामचा राहुल तांती, उत्तराखंडच्या सतीशसिंग राणा (२६) यांचाही या आगीत मृत्यू झाला आहे. झारखंडमधील एका कुटुंबाचे तर दोन तरुण मुलगे या आगीत मृत्युमुखी पडल्यामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, गोवा वैद्यकीय महाविद्यालय, बांबोलीम येथे पाच जखमींवर उपचार सुरू आहेत, अशी माहिती आरोग्य सचिव यतींद्र मराळकर यांनी दिली. त्यापैकी चार पुरुषांना सुमारे १२ टक्के भाजल्याचे जखमा असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे, तर २० वर्षीय एका तरुणीला २९ टक्के भाजल्याचे जखमा असून तिचीही प्रकृती नियंत्रणात असल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले.

नाइटक्लबमध्ये कार्यरत असलेला कर्मचारी आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार जयेश दिवकर यांनी आगीच्या भीषणतेचे वर्णन करताना सांगितले की, ''अचानक आगीचा स्फोट झाला आणि काही सेकंदांत संपूर्ण क्लबमध्ये आग पसरली. धुराचे लोट इतके दाट होते की श्वास घेणेही अशक्य झाले. काही लोक बाहेर पडण्यात यशस्वी झाले, मात्र स्वयंपाकघरातील अनेक जण अडकून पडले.'' या क्लबमध्ये बेकायदेशीर कारभार सुरू असल्याच्या प्राथमिक संकेतांनी संतापाचा ज्वालामुखी अधिकच उफाळून आला आहे. कागदोपत्री परवानग्या, अग्निसुरक्षा उपाय, सुरक्षा ऑडिटकृसगळं काही तोंडी आणि राजकीय कृपेवर चालत होतं का? अशा रसायनांचा, फटाक्यांचा साठा एका क्लबमध्ये कसा काय ठेवला जातो? कोणत्या अधिकाऱ्याने डोळेझाक केली? कोणत्या व्यवस्थापनाने महत्त्वाच्या सुरक्षा नियमांना पायदळी तुडवून निरपराधांचा बळी घेतला? थोडीशी जबाबदारी, थोडीशी दक्षता दाखवली असती तर आज २५ कुटुंबे उध्वस्त झाली नसती.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी रात्रीच घटनास्थळी धाव घेतली. ''गोव्यासाठी हा अत्यंत दु:खद दिवस आहे, दोषींना वाचू देणार नाही,'' अशी त्यांनी दिलेली प्रतिक्रिया खरी असेल तर आता जबाबदार असणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. कारण इथं चूक नाहीकृगुन्हा झाला आहे. आणि हा गुन्हा २५ कुटुंबांचा संसार उद्धवस्त करणारा, गोव्याच्या प्रतिमेला काळा ठिपका लावणारा, आणि पर्यटन क्षेत्राच्या सुरक्षिततेवर मोठं प्रश्नचिन्ह उभं करणारा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मदत जाहीर केली असली तरी पैशाने हे जखमांचे डोंगर भरून निघणार नाहीत. जी व्रणं या रात्रीने तयार केली आहेत ती आयुष्यभर भरून निघायची नाहीत. या दुर्घटनेने गोव्याचा आनंदोत्सव क्षणात मातंगात बदलला आहे.

### अरुंद प्रवेश–निर्गम मार्गामुळे अग्निशमन दलाला

अरपोरा नदीच्या बॅकवॉटरमध्ये बांधलेला या क्लबला 'आयर्लंड क्लब' असे म्हणतात. मिळालेल्या माहितीनुसार, क्लबमध्ये प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग अरुंद आहेत. यामुळे आग लागल्यानंतर अग्निशमन दल क्लबपर्यंत पोहोचू शकले नाही आणि त्यांना ४०० मीटर दूर गाडी उभी करावी लागली. यामुळे बचावकार्यात बराच विलंब झाला. अधिकाऱ्यांच्या मते, बहुतेक मृत्यू धुरामुळे आणि गुदमरल्यामुळे झाले. क्लबच्या व्यवस्थापकाला अटक करण्यात आली आहे. आग लागण्याच्या कारणांची चौकशी सुरू आहे.

### सुरक्षा मानकांवर मोठे प्रश्नचिन्ह

या घटनेनंतर क्लबच्या बांधकाम, सुरक्षा आणि अग्निसुरक्षा मानकांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अरपोरा–नगुआ पंचायतचे सरपंच रोशन रेडकर यांनी सांगितले की, क्लब वादात होता. भागीदारांमधील वादामुळे पंचायतीने जागेची पाहणी केली होती आणि क्लब परवानगीशिवाय बांधला असल्याचे आढळले होते. यासाठी पाडण्याची नोटीस (तोडण्याचे नोटीस) देखील जारी करण्यात आले होते, परंतु मालकांच्या उच्च संपर्कामुळे कारवाई थांबवण्यात आली.

प्रत्यक्षदर्शी फातिमा शेख यांच्या मते, आग लागताच आतमध्ये मोठी धावपळ उडाली. त्यावेळी क्लबमध्ये वीकेंड पार्टी सुरू होती आणि सुमारे १०० लोक डान्स फ्लोअरवर होते. धूर आणि ज्वाळा दिसताच, अनेक लोक घाबरून खाली धावले आणि चुकून तळमजल्यावरील स्वयंपाकघरात पोहोचले. तेथे आधीच उपस्थित असलेले कर्मचारीही अडकले. फातिमा यांनी सांगितले,

बाहेर पडण्याचा मार्ग खूप अरुंद होता, त्यामुळे लोक बाहेर पडू शकले नाहीत. काही मिनिटांतच संपूर्ण क्लब आगीच्या भक्ष्यस्थानी पडला, तिथे पामच्या पानांनी सजावट केली होती, जी लगेच जळून खाक झाली. अनेक लोक कसेबसे बाहेर पडले, पण काहीजण आतच अडकले.

# कोकण हापूसच्या जीआय मानांकनावर वाद, गुजरातकडून 'वलसाड हापूस'ची मागणी

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

कोकण हापूस आंब्याच्या भौगोलिक मानांकनावर (GI –Geographical Indication) सध्या वाद निर्माण झाला असून गुजरात सरकारकडून 'वलसाड हापूस' या नावाने स्वतंत्र जीआय मानांकन देण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी, निर्यातदार आणि व्यापारी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

कोकण हापूस हा आंबा चव, सुगंध, टिकाव, गोडी आणि आंतरराष्ट्रीय मागणीसाठी प्रसिद्ध असून अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो. आंब्याच्या जागतिक बाजारपेठेत "Kokan Alphonso" ही ओळख तयार झाली आहे.

सन २०१८ मध्ये कोकण हापूसला अधिकृतपणे 'कोकण हापूस' हे कायदेशीर भौगोलिक मानांकन (GI Tag) प्राप्त झाले होते. हे मानांकन मिळवण्यासाठी कोकणातील शेतकऱ्यांनी आणि विविध संस्थांनी तब्बल १० वर्षांचा संघर्ष केला होता. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील विशिष्ट हवामान, जमिनीचा पोत, पर्जन्यमान आणि तापमानामुळे कोकणातील हापूसची चव वेगळी असल्याचे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध




करण्यात आले आहे.

मात्र आता गुजरातच्या वलसाड परिसरात उत्पादित होणाऱ्या हापूस जातीच्या आंब्यासाठी 'वलसाड हापूस' असे स्वतंत्र जीआय मानांकन द्यावे, अशी मागणी गुजरातकडून पुढे आली आहे. यामुळे मूळ कोकण हापूसच्या ब्रँड व्हॅल्यूवर गदा येण्याची भीती कोकणातील शेतकरी व्यक्त करत आहेत.

कोकणातील शेतकरी संघटना आणि आंबा उत्पादकांचे म्हणणे आहे की, हापूस ही केवळ जात नाही तर कोकणाच्या भौगोलिक परिस्थितीशी जोडलेली ओळख आहे. इतर राज्यांत उत्पादन झाले तरी त्या चवीत, सुगंधात आणि दर्जात फरक जाणवतो. जर वेगवेगळ्या नावांनी हापूसचे जीआय मानांकन दिले गेले, तर बाजारपेठेत ग्राहकांची दिशाभूल होईल आणि कोकणातील शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागेल, असे मत व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार, जीआय नोंदणी प्राधिकरण आणि राज्य शासन पुढे काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण कोकणाचे लक्ष लागले आहे. कोकण हापूसची जागतिक ओळख अबाधित राहावी आणि शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.


## थोडक्यात

### परवीण शेख यांना शताब्दी वन्यजीव सेवा पुरस्कार

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

BNHS (बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी) मध्ये कार्यरत प्रख्यात वन्यजीव शास्त्रज्ञ परवीण शेख यांना त्यांच्या वन्यजीव संवर्धनातील उत्कृष्ट योगदानासाठी शताब्दी वन्यजीव सेवा पुरस्कार देण्यात आला आहे. परवीण शेख यांनी गेल्या अनेक वर्षांपासून भारतातील विविध प्राणी व पक्षी प्रजातींच्या संरक्षणासाठी अविरत काम केले आहे. त्यांच्या कार्यामुळे संकटग्रस्त प्रजातींचा संवर्धनात मोठा बदल झाला असून स्थानिक समुदायांमध्ये वन्यजीव संरक्षणाची जाणीव निर्माण झाली आहे. या पुरस्काराबाबत बोलताना शेख म्हणाले, ''वन्यजीव संवर्धन हा केवळ संशोधनाचा विषय नाही, तर आपल्या नैसर्गिक वारशाचे रक्षण करण्याची जबाबदारी देखील आहे. हा पुरस्कार माझ्या टीमच्या मेहनतीला मिळालेला गौरव आहे.'' BNHS संस्थेने ही घोषणा करताना म्हटले की, परवीण शेख यांचे कार्य वन्यजीव संवर्धनाच्या क्षेत्रात प्रेरणादायी ठरले आहे आणि भविष्यातही त्यांच्या कामाचा प्रभाव व्यापक स्वरूपात राहील.

### नारडुवेत दोन गव्यांच्या झुंजीत मादी रानगव्याचा मृत्यू



**नारडुवे । प्रतिनिधी**

तालुक्यातील नारडुवे परिसरात दोन गव्यांमध्ये झालेल्या भीषण झुंजीत एका मादी रानगव्याचा मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी सुमारे ७ वाजता मृत गवा आढळून आल्यानंतर वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. दुसऱ्या गव्याच्या शिंगात मागील उजवा पाय अडकल्याने मादी गवा गंभीर जखमी झाल्याचे स्पष्ट झाले. पशुधन विकास अधिकारी कडवई यांनी शवविच्छेदन केले. नंतर जेसीबीच्या मदतीने खड्डा खोदून दहन करून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली. वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.


**सिंधुदुर्ग समाचार**

दैनिक सिंधुदुर्ग समाचारमधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिध्दी दिली जाईल, लेख, कथा, कविता sindhudurg.samachar@gmail.com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरु करण्यासाठी व जाहिराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com


## तळेरे–कोल्हापूर महामार्ग रुंदीकरणाला गती



**कोल्हापूर:** तळेरे ते कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण काम आता पुन्हा गती घेऊ लागले आहे. पश्चिम महाराष्ट्र व तळकोकणाला जोडणाऱ्या या मार्गाला पूर्वी विजयदुर्ग–कोल्हापूर राज्य महामार्ग क्र. ११५ मधून दर्जोन्नती मिळाल्यानंतर त्याचे नामांतर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ असे करण्यात आले. मागील काही महिन्यांपासून आनंदनगर हद्दीतील शासकीय कागदोपत्री भूसंपादनाची नोंद उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक भूधारकांनी रुंदीकरण कामाला तीव्र विरोध केला होता. त्यांनी नुकसानभरपाई मिळेपर्यंत महामार्गावर काम सुरू न करण्याचा लेखी इशारा प्रशासकीय यंत्रणेला दिला होता.आता यावर तोडगा निघाला असून, जेवढे भूसंपादन पूर्ण झाले आहे, त्याच भागात काम सुरू करण्याचा निर्णय हायवे प्राधिकरणाने घेतला आहे. तसेच, नुकसानभरपाईबाबत शासन निर्णयानुसार प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले. यामुळे गेल्या अनेक महिने बंद असलेले आनंदनगर येथील काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. सध्या तळेरे–कोल्हापूर मार्गावरील कामकाज कणकवली तालुक्यातील तळेरे, कासार्डे, आनंदनगर आणि वैभववाडी तालुक्यातील नाधवडे, कोकीसरे, एडगाव, करूळ तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातून कोल्हापूर शहराकडे सुरु आहे. मौजे कासार्डे–आनंदनगर हद्दीत महामार्ग नेमका कोणत्या जमीन मिळकतींमधून जातो याची गाव नकाशा, गटबुक नकाशा व शासकीय कागदोपत्री नोंद आधी उपलब्ध नसल्यामुळे भूधारक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन संघर्ष समितीची स्थापना केली होती. आता प्रशासकीय निर्णयानंतर या भागातील काम पुन्हा सुरु करण्यात आले आहे.

# कोकण हापूसच्या हक्काची लढाई

**कोकणचा** हापूस आंबा हा केवळ एक फळ नसून तो कोकणाची ओळख, अर्थव्यवस्थेचा कणा, शेतकऱ्यांच्या जीवनातला आधार आणि भारताच्या कृषी वैभवाचा अभिमान आहे. देशातच नव्हे, तर जगभरात कोकणच्या हापूस आंब्याला जे स्थान मिळाले आहे, ते अन्य कोणत्याही भारतीय आंब्याला सहज मिळालेले नाही. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, जर्मनी, जपान, आखातातील देश अशा अनेक आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये 'अल्फोन्सो' म्हणजेच कोकणचा हापूस हा सर्वोत्तम दर्जाचा आंबा म्हणून ओळखला जातो. त्याची सुवासिक चव, गोडी, गर, रंग, टिकाऊपणा आणि आकर्षक आकार यामुळे तो ''आंब्यांचा राजा'' मानला जातो. या वैशिष्ट्यांमुळेच कोकणच्या हापूसला २०१८ साली कायदेशीर भौगोलिक मानांकन म्हणजेच जीआय टॅग (Geographical Indication) मिळाला. हा मानांकन मिळवण्यासाठी कोकणातील शेतकरी, सहकारी संस्था, उद्योजक, संशोधक आणि शासन यांना जवळजवळ दहा वर्षे सातत्यपूर्ण संघर्ष करावा लागला होता. मात्र आता या ऐतिहासिक भूगोलिक ओळखीवर गुजरातकडून 'वलसाड हापूस' या नावाने स्वतंत्र जीआय मानांकन मिळवण्याची मागणी पुढे आल्याने एक नवा वाद निर्माण झाला आहे आणि हा वाद केवळ नावापुरता नसून कोकणच्या अर्थकारणावर, शेतकऱ्यांच्या भविष्यावर आणि भौगोलिक अस्मितेवर गदा आणणारा ठरू शकतो.

हापूस आंब्याचे मूळ कोकणातच आहे, हे ऐतिहासिक, शास्त्रीय आणि बाजारपेठेतील सर्व पुरावे सांगतात. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यांतील समुद्रकिनारा, लाल माती, खारट वारे, पावसाचे विशिष्ट प्रमाण आणि तापमानातील नैसर्गिक संतुलन यामुळे हापूस आंब्याला त्याची खास चव, सुगंध आणि टिकाऊपणा प्राप्त झाला आहे. याच वैशिष्ट्यांमुळे जगभरात 'कोकण हापूस' ही स्वतंत्र ओळख तयार झाली. या आंब्याच्या ब्रँड व्हॅल्यूमुळे दरवर्षी हजारो कोटींची उलाढाल होते. लाखो शेतकरी, मजूर, व्यापारी, पॅकिंग उद्योग, वाहतूक व्यवस्था आणि निर्यात व्यवसाय या एका फळावर अवलंबून आहे. त्यामुळे २०१८ साली मिळालेला जीआय टॅग हा केवळ कायदेशीर शिक्का नव्हता, तर तो कोकणच्या शेतकऱ्यांच्या कष्टांना मिळालेली मान्यता होती.

जीआय टॅगचा अर्थ सोपा आहे. एखाद्या उत्पादनाच्या दर्जामागे त्या भागाचे भौगोलिक, हवामानिक, नैसर्गिक आणि मानवी कौशल्य यांचा थेट संबंध असतो आणि त्यामुळे त्या नावाचा वापर इतरत्र चुकीच्या पद्धतीने होऊ नये, यासाठी तो कायदेशीररीत्या संरक्षित केला जातो. जसे दार्जिलिंग चहा, बनारसी साडी, तिरुपती लाडू, कोल्हापुरी चप्पल, नाशिकचा द्राक्ष वाइन, तसेच कोकणचा हापूस हा देखील जीआय संरक्षित आहे. याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होतो, कारण बनावट किंवा दर्जाहीन माल त्या नावाने विकला जाऊ शकत नाही आणि आंतरराष्ट्रीय बाजारात देखील त्या उत्पादनाचा विश्वास टिकून राहतो.

मात्र आता गुजरातमधील वलसाड भागातून 'गुजरात वलसाड हापूस' या नावाने स्वतंत्र जीआय मानांकन देण्याची मागणी पुढे आली आहे. महाराष्ट्राने मिळवलेल्या 'कोकण हापूस' या नावावर आधीच कायदेशीर मानांकन अस्तित्वात असताना दुसऱ्या राज्यात त्याच जातीसाठी वेगळे मानांकन देण्याचा प्रयत्न हा गंभीर प्रश्न निर्माण करणारा आहे. या मागणीमागे गुजरातमधील काही शेतकरी संघटना, व्यापारी आणि निर्यातदार कार्यरत आहेत, असा दावा केला जातो. त्यांचा युक्तिवाद असा आहे की वलसाड भागातील हापूस पिकतो, तिथल्या हवामानामुळे त्यालाही चांगला दर्जा मिळतो आणि त्यामुळे त्यांनाही स्वतंत्र ओळख मिळायला हवी. येथेच हा वाद अधिक गुंतागुंतीचा बनतो.

खरे तर जातीच्या पातळीवर पाहिले तर हापूस हा एकच आहे, मात्र भौगोलिक परिस्थितीमुळे चव, टिकाऊपणा आणि बाजारमूल्यात मोठा फरक पडतो. कोकणात पिकणारा हापूस नैसर्गिकरित्या उत्तम




प्रतीचा मानला जातो, तर इतर भागात पिकणाऱ्या आंब्यांना अनेकदा तंत्रज्ञानाचा, रसायनांचा आणि कृत्रिम पक्वतेचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळेच आजपर्यंत जागतिक बाजारपेठेत “Alphonso from Konkan” हीच ओळख प्रस्थापित झाली आहे. जर उद्या गुजरातलाही स्वतंत्र जीआय टॅग मिळाला, तर आंतरराष्ट्रीय खरेदीदारांमध्ये संभ्रम निर्माण होणार असून कोकणच्या हापूसच्या ब्रँड व्हॅल्यूवर याचा मोठा परिणाम होण्याची भीती आहे.

या वादाचा दुसरा गंभीर पैलू म्हणजे आर्थिक नुकसान. कोकणातील लाखो शेतकरी हापूसवर पूर्णतः अवलंबून आहेत. हवामानाचा फटका, अवकाळी पाऊस, रोगराई, बाजारातील चढउतार हे सगळे संकट सोसूनही शेतकरी हापूसच्या एका हंगामावर आपले वर्ष चालवतो. जीआय टॅगमुळे त्याला थोडे तरी संरक्षण मिळाले होते. पण जर वेगवेगळ्या राज्यांतून त्याच नावाने आंबे बाजारात आले आणि दर्जामध्ये फरक असतानाही एकाच नावाखाली विक्री सुरू झाली, तर दर कोसळणे, निर्यात घटणे आणि शेतकऱ्यांना तोटा होणे अटळ आहे. हाच अनुभव याआधी कांदा, केळी, डाळी आणि कापूस यांसारख्या पिकांमध्ये शेतकऱ्यांनी घेतलेला आहे.

मात्र या संपूर्ण विषयाला दुसरी बाजूही आहे. गुजरातमधील काही शेतकरी खरोखरच हापूसाची लागवड करतात, त्यांचे उत्पादन चांगले आहे आणि तेही बाजारात टिकून राहण्यासाठी झगडत आहेत. त्यांचे म्हणणे असे की केवळ एका राज्यालाच एखाद्या जातीवर हक्क देता येऊ नये. जर वैज्ञानिकदृष्ट्या त्यांचा आंबा हापूस जातीचा सिद्ध होत असेल, तर त्यांनाही ओळख मिळावी. शेती हा कोणत्याही एकाच प्रांताचा मक्तेदारीचा विषय नसल्यामुळे 'हापूस' ही जात फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित का असावी, हा प्रश्न ते उपस्थित करतात.

परंतु येथे एक महत्त्वाचा फरक समजून घेणे आवश्यक आहे. जीआय टॅग हा जातीला नसून त्या जातीच्या भौगोलिक वैशिष्ट्यांना दिला जातो. हापूस जात म्हणून कुठेही लागवड करता येऊ शकते, पण 'कोकण हापूस' ही केवळ जात नाही, तर तो त्या विशिष्ट भूभागाशी निगडित असलेला दर्जा आहे. म्हणूनच कोकणच्या बाहेर पिकलेल्या हापूससाठी 'कोकण हापूस' हे नाव वापरणे कायदेशीर गुन्हा ठरतो. हा कायदा ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी आणि मूळ उत्पादकांचे संरक्षण करण्यासाठीच बनवण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर गुजरातची 'वलसाड हापूस' ही मागणी मान्य झाल्यास उद्या इतर राज्येही अशाच मागण्या करतील का, हा प्रश्नही निर्माण होतो. कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तेलंगणा येथेही हापूस लागवड होते. ते उद्या 'कर्नाटक हापूस', 'तेलंगणा हापूस' अशा नावाने मानांकन मागू लागले, तर जीआय टॅगची संपूर्ण संकल्पनाच अर्थहीन होण्याचा धोका आहे. त्यामुळे एकदा संरक्षण दिलेल्या भौगोलिक ओळखीवर दुसऱ्यांदा आघात होऊ नये, हीच कोकणवासियांची आणि महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांची ठाम भूमिका आहे.

या वादात राजकीय रंग चढणेही अपरिहार्य ठरले आहे. महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन औद्योगिकदृष्ट्या बलाढ्य राज्ये आहेत. उद्योग, बंदरे, निर्यात, व्यापार, गुंतवणूक यासाठी आधीच स्पर्धा आहे. त्यात आता हापूस आंब्याचा मुद्दा सामील झाल्याने हा वाद केवळ कृषीपुरता मर्यादित न राहता राजकीय प्रतिष्ठेचा प्रश्न बनत चालला आहे. महाराष्ट्र सरकारने या प्रकरणात ठाम भूमिका घेऊन केंद्राकडे आपली बाजू मांडणे अत्यंत आवश्यक आहे. जीआय नोंदणी ही केंद्र सरकारच्या अखत्यारीतील बाब असली, तरी राज्य सरकारची भूमिका, पाठपुरावा आणि शेतकऱ्यांचे हित जपण्याची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे.

कोकणातील शेतकरी आज अनेक संकटांशी झुंज देत आहेत. आंबा उत्पादन खर्च वाढतो आहे, मजुरी महाग होते आहे, पाण्याचा प्रश्न, बदलते हवामान, फळगळ, रोगराई यामुळे आधीच उत्पादन धोक्यात येते आहे. त्यात जर बाजारपेठेत आणखी गोंधळ निर्माण झाला, तर शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याची भीती आहे. हापूस हा केवळ फळ नाही, तर कोकणच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आंब्याच्या बागा म्हणजे हजारो कुटुंबांचा आधार आहे. त्यामुळे या विषयाकडे केवळ कायदेशीर कलमांच्या चौकटीत पाहून चालणार नाही, तर त्यामागील मानवी आयुष्ये, श्रम आणि भविष्याचा विचार करावा लागेल.

या वादातून एक सकारात्मक संधीही निर्माण होऊ शकते, ती म्हणजे देशपातळीवर जीआय टॅगबाबत अधिक स्पष्ट, कडक आणि पारदर्शक धोरण तयार करण्याची. जर एखाद्या उत्पादनावर दोन राज्यांचा दावा असेल, तर त्याचे वैज्ञानिक मूल्यमापन, हवामान, माती, उत्पादनाची चव, टिकाऊपणा, बाजारमूल्य या सर्व बाबींचा अभ्यास करून अंतिम निर्णय घेतला जाणे आवश्यक आहे. राजकीय दबावाखाली किंवा व्यापारी लॉबीच्या प्रभावाखाली जीआय सारखे संवेदनशील हक्क वाटले गेले, तर भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.

शेवटी प्रश्न इतकाच आहे की हापूस हा आंबा कोणाचा आहे, यापेक्षा कोकणच्या हापूसची वेगळी ओळख टिकणार आहे का, हा खरा मुद्दा आहे. महाराष्ट्राने २०१८ साली मिळवलेला 'कोकण हापूस' जीआय टॅग हा कायदेशीरदृष्ट्या संरक्षित आहे आणि तो जपण्याची जबाबदारी राज्य, केंद्र सरकार आणि समाज म्हणून आपली आहे. गुजरातमधील शेतकऱ्यांचा विकास व्हावा, त्यांना देखील न्याय मिळावा, याला कोणीही विरोध करणार नाही. मात्र तो न्याय कोकणच्या हापूसच्या हक्कावर दरोडा टाकून मिळवण्याचा प्रयत्न होऊ नये, हीच अपेक्षा आहे.

हा वाद केवळ दोन राज्यांमधील संघर्ष न राहता तो भविष्यात संपूर्ण देशातील जीआय धोरणासाठी एक निर्णायक टप्पा ठरू शकतो. त्यामुळे आज गरज आहे ती भावनेपेक्षा तथ्यांना, राजकारणापेक्षा शेतकऱ्यांच्या हिताला आणि तात्पुरत्या फायद्यांपेक्षा दीर्घकालीन राष्ट्रीय धोरणाला प्राधान्य देण्याची. हापूस आंब्याचा गोडवा केवळ जिभेवरच नव्हे, तर धोरणांमध्येही टिकून राहील, याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आहे.

# हिवाळी अधिवेशनाचा कस



विक्रम कदम

**सोमवारपासून** नागपूर येथे महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होत असताना राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात प्रचंड खळबळ उडण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. हे अधिवेशन केवळ औपचारिक ठरणार नसून सरकारच्या कार्यक्षमतेची, पारदर्शकतेची आणि लोकहितावरील बांधिलकीची खरी कसोटी ठरणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुका, त्यातील वाद, निवडणूक व्यवस्थेतील गोंधळ, अतिवृष्टीचा फटका, शेतकरी मदतीतील भ्रष्टाचार, १२ जिल्ह्यांतील पुढे ढकललेल्या निवडणुका, पैशांच्या वाटपावरून निर्माण झालेले संशय, तसेच मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर झालेली उलथापालथ या सर्व मुद्द्यांमुळे हे अधिवेशन तापणार हे निश्चित आहे. याच पार्श्वभूमीवर 'विकसित महाराष्ट्र धोरण २०४७' हा दीर्घकालीन आराखडाही चर्चेच्या केंद्रस्थानी राहणार आहे.

यंदा झालेल्या अतिवृष्टीने राज्यातील हजारो शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या सर्व भागांत पावसाने थैमान घातले. कापूस, सोयाबीन, तूर, भात, ऊस, भाजीपाला या सर्व पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतात उभ्या पिकावर पाणी फिरले, तर काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली. सरकारने पंचनामे आणि मदतीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्ष मदत मिळण्यात झालेला विलंब, अपुरी नुकसानभरपाई आणि लाभार्थी निवडीतील संशय यामुळे शेतकरी प्रचंड अस्वस्थ आहेत. अनेकांना अजूनही मदत मिळालेली नाही, तर अपात्रांना लाभ मिळाल्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. त्यामुळे विरोधकांकडून अधिवेशनात अतिवृष्टीग्रस्तांसाठी विशेष पॅकेजची मागणी लावून धरली जाणार आहे.

शेतकरी मदतीतील भ्रष्टाचार हा आणखी एक गंभीर मुद्दा आहे. पंचनाम्यांमध्ये फेरफार, बनावट नावे, राजकीय हस्तक्षेप, दलालांची साखळी आणि काही अधिकाऱ्यांच्या संगनमताचे आरोप यामुळे प्रशासनाची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. काही जिल्ह्यांत एकाच शेतासाठी अनेक वेळा पंचनामे झाल्याची प्रकरणे उघडकीस आली आहेत. सरकारने चौकशीची घोषणा केली असली तरी ठोस कारवाई अद्याप दिसलेली नाही. त्यामुळे या मुद्द्यावर विरोधक सरकारला जाब विचारणार हे निश्चित आहे.

निवडणुकांमधील वाद, निवडणूक प्रक्रियेतील गोंधळ आणि पैशांच्या वाटपावरून झालेले आरोप हे अधिवेशनातील आणखी एक मोठे रणांगण ठरणार आहे. निवडणूक काळात मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम, सोने, दारू जप्त झालीय परंतु अनेक तक्रारी असूनही कारवाई अपुरी ठरल्याचा आरोप आहे. पैशांच्या जोरावर मतदारांवर प्रभाव टाकण्याचे प्रकार वाढल्याने लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास हादरल्याची भावना निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर १२ जिल्ह्यांतील पुढे ढकलण्यात आलेल्या निवडणुका अधिकच वादग्रस्त ठरल्या आहेत. तांत्रिक अडचणी, कायदा–सुव्यवस्था आणि हवामानाचे कारण देत निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. मात्र ऐन निवडणूक काळात घेतलेल्या या निर्णयामुळे उमेदवारांचा खर्च वाया गेला, प्रचार यंत्रणा कोलमडली आणि मतदार संभ्रमात पडले. काही ठिकाणी हा निर्णय राजकीय फायद्यासाठी घेतल्याचा संशय व्यक्त केला जात असून त्यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

मराठा आरक्षणाचा प्रश्नही या अधिवेशनात पुन्हा ऐरणीवर येण्याची दाट शक्यता आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न न्यायालय आणि राजकारण यांच्या कचाट्यात अडकलेला आहे. निवडणुकांच्या तोंडावर आश्वासने दिली गेली, आंदोलने झाली, पण प्रत्यक्षात ठोस तोडगा निघालेला नाही. आरक्षणाअभावी मराठा समाजातील तरुण प्रचंड अस्वस्थ असून शिक्षण व नोकरीत त्यांना मोठा संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे अधिवेशनात या विषयावर ठोस निर्णयाची मागणी जोर धरू शकते.

याच सर्व पार्श्वभूमीवर सरकारने 'विकसित महाराष्ट्र धोरण २०४७' हा दीर्घकालीन विकास आराखडा मांडला आहे. उद्योग, शेती, शिक्षण, आरोग्य, डिजिटल अर्थव्यवस्था, हरित ऊर्जा, महिला सक्षमीकरण आणि युवक कौशल्य विकास यावर आधारित हा आराखडा महत्वाकांक्षी आहे. मात्र निधी, अंमलबजावणी, ग्रामीण–शहरी समतोल, बेरोजगारी, स्थलांतर, पाणीटंचाई, पर्यावरण आणि पायाभूत सुविधा या प्रश्नांवर सरकार काय ठोस निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे अधिवेशन विदर्भाच्या केंद्रस्थानी नागपूर येथे होत असल्याने विदर्भातील शेतकरी आत्महत्या, सिंचन प्रकल्पांचा रखडलेला वेग, रोजगाराचा अभाव, आरोग्य सुविधा, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी आणि आदिवासी विकास या प्रश्नांवरही गंभीर चर्चा होणे अपेक्षित आहे. विदर्भासाठी केवळ घोषणाच नव्हे, तर प्रत्यक्ष विकासाची दिशा अत्यावश्यक आहे.

एकूणच, हे हिवाळी अधिवेशन केवळ राजकीय गदारोळापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या भवितव्याची दिशा ठरवणारे ठरेल का, हा खरा प्रश्न आहे. शेतकऱ्यांना दिलासा, तरुणांना रोजगार, मराठा समाजाला न्याय, ग्रामीण महाराष्ट्राला विकासाचा वेग आणि 'विकसित महाराष्ट्र २०४७' या संकल्पनेला ठोस स्वरूप हीच आज राज्याची अपेक्षा आहे. नागपूरच्या सभागृहात होणाऱ्या चर्चांमधून वास्तव निर्णय निघतात की पुन्हा केवळ आरोप–प्रत्यारोपात वेळ जातो, यावर महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक भविष्याची दिशा ठरणार आहे.

## दिनविशेष — बुध्दत्वाची ज्योती

पद्मा भेलके

**८ डिसेंबर** हा दिवस जगभरात 'बोधी दिन' म्हणून अत्यंत श्रद्धा, शांतता आणि आत्मजागृतीच्या भावनेने साजरा केला जातो. हा दिवस भगवान गौतम बुद्धांच्या ज्ञानप्राप्तीचा, म्हणजेच बोधीप्राप्तीचा स्मरणदिन आहे. सत्य, करुणा, अहिंसा आणि मध्यम मार्गाचा संदेश जगाला देणाऱ्या बुद्धांनी याच दिवशी बोधगया येथे बोधिवृक्षाखाली कठोर तपश्चर्या आणि अंतरंगातील शोधातून पूर्ण ज्ञानप्राप्ती केली, अशी परंपरा सांगते. त्यामुळे बोधी दिन हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो मानवतेच्या, आत्मिक परिवर्तनाच्या आणि विश्वशांतीच्या विचारांचा जागर करणारा दिवस आहे.

राजकुमार सिद्धार्थ गौतम यांचा जन्म लुंबिनी येथे झाला. ऐश्वर्य, वैभव, सुखसोयी यांचा त्यांना अभाव नव्हताय मात्र जीवनातील दुःख, आजार, वृद्धत्व आणि मृत्यू यांचे वास्तव पाहून त्यांच्या मनात तीव्र अस्थैर्य निर्माण झाले. 'मानवी जीवनात इतके दुःख का आहे?' या प्रश्नाने त्यांना आतून अस्वस्थ केले. अखेरीस त्यांनी सर्व भौतिक सुखांचा त्याग करून सत्याच्या शोधासाठी गृहत्याग केला. अनेक वर्षे कठोर तपश्चर्या, उपवास, साधना केल्यानंतरही त्यांना अपेक्षित समाधान मिळत नव्हते. तेव्हा त्यांनी अत्यंत कठोर तपस्येऐवजी मध्यम मार्ग स्वीकारला. बोधगयेतील एका पिंपळाच्या झाडाखाली त्यांनी अखंड ध्यानधारणा सुरू केली आणि अनेक दिवसांच्या ध्यानानंतर अखेर ८ डिसेंबरच्या पहाटे त्यांनी बुद्धत्व प्राप्त केले, असा विश्वास आहे. त्या पिंपळाच्या झाडालाच पुढे 'बोधिवृक्ष' म्हणून ओळख मिळाली. बुद्धत्वाची प्राप्ती म्हणजे केवळ वैयक्तिक मोक्ष नव्हता, तर संपूर्ण मानवजातीसाठी करुणेचा, सत्याचा आणि अहिंसेचा एक नवा प्रकाश होता. बुद्धांनी चार आर्यसत्य यांचा उपदेश केला. दुःखाचे अस्तित्व, दुःखाचे कारण, दुःखाचा नाश आणि दुःख नष्ट करण्याचा मार्ग. याच मार्गाला त्यांनी अष्टांगिक मार्ग म्हणून स्पष्ट केले. योग्य विचार, योग्य वाणी, योग्य कृती, योग्य उपजीविका, योग्य प्रयत्न, योग्य स्मृती, योग्य एकाग्रता आणि योग्य दृष्टिकोन या आठ अंगांनी सजलेला हा मार्ग मानवाला अंतरिक शांततेकडे नेतो, असे बुद्धांचे मत होते. बोधी दिन हा या महान तत्त्वज्ञानाचा जागर करणारा दिवस म्हणून ओळखला जातो.

आज जगभरातील बौद्ध देशांमध्ये भारत, नेपाळ, श्रीलंका, थायलंड, म्यानमार, जपान, चीन, कोरिया, तिबेट यां सारख्या देशांमध्ये बोधी दिन विविध परंपरा नुसार साजरा केला जातो. काही ठिकाणी संपूर्ण रात्र ध्यानधारणा, प्रार्थना, बुद्ध वंदना, दीपप्रज्वलन केले जाते. बोधिवृक्षाची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी लोक उपवास करून मन, वाणी आणि शरीर शुद्ध ठेवण्याचा संकल्प करतात. बौद्ध भिक्षू बुद्धांच्या जीवनावर प्रवचन देतात आणि करुणा, मैत्री, समता यांचा संदेश समाजात पसरवतात. आधुनिक काळातही बोधी दिन हा तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरतो, कारण तो केवळ धार्मिक श्रद्धेपुरता मर्यादित न राहता जीवनातील समतोल, मानसिक शांतता आणि नैतिक मूल्यांची आठवण करून देतो. बोधी दिनाचे महत्त्व केवळ बौद्ध धर्मापुरते मर्यादित नाही. आजच्या धकाधकीच्या, स्पर्धेच्या आणि तणावाच्या जगात बुद्धांचा मध्यम मार्ग अधिकच समर्पक वाटतो. भोगवाद आणि त्यागवाद यांच्यामधील संतुलित जीवनशैलीचा संदेश बुद्धांनी दिला. अती उपभोगाने माणूस अस्वस्थ होतो, तर अती त्यागाने शरीर आणि मन थकते. यामधला समतोल साधणारा मार्गच खरा मुक्तीचा



मार्ग आहे, असे बुद्धांनी सांगितले. बोधी दिन हा या समतोलाची, अंतर्मुखतेची आणि आत्मपरिक्षणाची संधी म्हणून पाहिला जातो.

आजच्या काळात वाढती हिंसा, द्वेष, मतभेद, धार्मिक संघर्ष यांच्या पार्श्वभूमीवर बुद्धांचा अहिंसेचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. बुद्धांनी कधीही हिंसेचा आधार घेतला नाही. त्यांनी शस्त्राऐवजी शब्दांचा आणि करुणेचा वापर केला. शत्रुलाही मैत्रीने जिंकण्याचा विचार त्यांनी मांडला. ''द्वेषाने द्वेष शांत होत नाही, तर प्रेमानेच तो शांत होतो,'' हे बुद्धांचे वचन आजही तितकेच सत्य वाटते. बोधी दिन हा या महान विचारांची नव्याने उजळणी करून देणारा दिवस आहे.

भारतात बोधी दिनाला विशेष धार्मिक महत्त्व आहे, कारण बुद्धांची बोधी प्राप्ती याच भूमीवर झाली. बिहारमधील बोधगया हे जागतिक तीर्थस्थान आजही लाखो श्रद्धाळूंना आकर्षित करते. बोधिवृक्ष, महाबोधी मंदिर, ध्यान मठ हे सर्व स्थळ साक्षात शांततेची अनुभूती देतात. बोधी दिनाला येथे विशेष महोत्सव साजरा केला जातो. देश–विदेशातून आलेले बौद्ध भिक्षू, श्रद्धाळू ध्यान, प्रवचन आणि प्रार्थनांमध्ये सहभागी होतात. दीपोत्सव, शांतता रॅली, करुणा यात्राही आयोजित केल्या जातात. बोधी दिनाचा खरा अर्थ मात्र बाह्य उत्सवापेक्षा अंतरिक परिवर्तनात आहे. हा दिवस माणसाला स्वतःकडे पाहायला, स्वतःच्या विचारांचा, वर्तनाचा, भावनांचा विचार करायला प्रवृत्त करतो. आपणही आपल्या आयुष्यातील अज्ञान, राग, लोभ, मोह यांवर विजय मिळवण्यासाठी प्रयत्न करावा, हा बोधी दिनाचा खरा संदेश आहे. बुद्धत्व म्हणजे केवळ एका व्यक्तीचे दिव्यत्व नव्हे, तर प्रत्येक मानवात असलेल्या करुणेच्या, शहाणपणाच्या आणि शांततेच्या शक्यतेची जाणीव करून देणारी अवस्था आहे.

सामाजिक पातळीवरही बोधी दिनाचा व्यापक अर्थ आहे. जात, धर्म, देश, भाषा, वंश या भेदांपलीकडे जाऊन मानवतेचा विचार करण्याची प्रेरणा हा दिवस देतो. बुद्धांनी सर्व प्राणीमात्रांविषयी करुणेचा भाव ठेवण्याचा उपदेश केला. ''सर्व प्राणी दुःख टाळू इच्छितात आणि सुख शोधतात,'' हा त्यांचा विचार आजच्या मानवकेंद्री जगाला नवा दृष्टिकोन देणारा आहे. केवळ माणसापुरते नव्हे, तर निसर्ग, प्राणी, पर्यावरण यांच्याशीही संतुलित नाते ठेवण्याची शिकवण बोधी दिन देतो.

आजच्या डिजिटल युगातही ध्यानधारणा, माइंडफुलनेस, मेडिटेशन यांसारख्या संकल्पनांना जगभरात प्रचंड महत्त्व मिळत आहे. यामागे बुद्धांच्या ध्यानमार्गाचीच प्रेरणा आहे, असे अनेक तज्ज्ञ मानतात. मानवी मनातील अस्थिरता, चिंता, ताणतणाव दूर करण्यासाठी बुद्धांचे श्वासावर लक्ष केंद्रित करणारे ध्यान, विपश्यना, करुणाभावना ही तंत्रे आज आधुनिक मानसशास्त्रातही वापरली जात आहेत. त्यामुळे बोधी दिन हा प्राचीन परंपरा आणि आधुनिक जीवन यांना जोडणारा सेतू ठरतो. एक प्रकारे बोधी दिन हा 'प्रकाशाचा दिवस' आहे.

अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा हा प्रवास प्रत्येक माणसाच्या आयुष्यात आवश्यक आहे. बाह्य यश, संपत्ती, प्रसिद्धी यांपेक्षा अंतरिक शांतता, समाधान आणि आत्मिक प्रगल्भता अधिक महत्त्वाची आहे, ही जाणीव बोधी दिन पुन्हा एकदा करून देतो. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस स्वतःशी बोलायलाही विसरतो. बोधी दिन मात्र क्षणभर थांबून स्वतःच्या मनाकडे पाहण्याची, श्वासाकडे लक्ष देण्याची आणि विचारांना शांत करण्याची संधी देतो.

म्हणूनच ८ डिसेंबरचा बोधी दिन हा केवळ एका धर्माचा सण नसून संपूर्ण मानवजातीसाठी आत्मजागृतीचा, करुणेचा, अहिंसेचा आणि शांतीचा संदेश देणारा दिवस आहे. बुद्धांचे जीवन, त्यांचा संघर्ष, त्यांची साधना आणि त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. जगात कितीही बदल झाले तरी माणसाच्या अंतर्मनातील दुःख, तणाव, भीती यांचा सामना करण्यासाठी बुद्धांनी दाखवलेला मार्ग चिरंतन आहे. बोधी दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या आयुष्यात थोडी शांतता, थोडी करुणा आणि थोडे ज्ञान जागवले, तर हाच त्या महान दिनाचा खरा सन्मान ठरेल.

## राशि भविष्य

**आजचा सुविचार:** *यशाचे नियम तेव्हाच लागू होतात जेव्हा तुम्ही प्रयत्न करता.*

**मेष :** आजचा दिवस कामाच्या दृष्टीने गतीमान राहील. रखडलेली कामे पूर्ण होतील. वरिष्ठांकडून कौतुक मिळण्याची शक्यता आहे. कुटुंबात सौहार्दाचे वातावरण राहील. आरोग्य उत्तम राहील.

**वृषभः** आज संयम ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही वादात पडू नये. खर्च वाढण्याची शक्यता असल्याने बजेट सांभाळा.

**मिथुन :** नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत बदलाचा विचार करणाऱ्यांसाठी चांगला दिवस आहे. मित्रांकडून मदत मिळेल.

**कर्कः** आज भावनिक निर्णय टाळावेत. कामात स्थिरता ठेवली तर यश मिळेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींचे मार्गदर्शन लाभेल.

**सिंहः** आज आत्मविश्वास वाढेल. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. समाजात मान–सन्मान वाढेल. मात्र अहंकार टाळा.

**कन्याः** कामाचा ताण वाढू शकतो, पण नियोजन केल्यास सर्व सुरळीत पार पडेल. आरोग्याची विशेष काळजी घ्या.

**तुलाः** आजचा दिवस आनंददायी ठरेल. नवीन ओळखी फायद्याच्या ठरतील. कला, लेखन, मीडिया क्षेत्राशी संबंधित लोकांसाठी उत्तम दिवस आहे. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील.

**वृश्चिकः** आज संयमाची परीक्षा पाहणारा दिवस असू शकतो. गैरसमजामुळे नातेसंबंध बिघडू शकतात. कामात गुप्त शत्रूंविषयी सावध रहा.

**धनु :** भाग्योदयाचा काळ सुरु होईल. अडलेली कामे मार्गी लागतील. प्रवासातून लाभ होईल. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासात यश मिळण्याचा योग आहे.

**मकरः** आज जबाबदाऱ्या वाढतील. कामात सातत्य ठेवल्यास यश नक्की मिळेल. घरात काही शुभ कार्याची चर्चा होऊ शकते.

**कुंभः** नवीन कल्पनांना आज उत्तम प्रतिसाद मिळेल. व्यवसायात नावीन्यपूर्ण प्रयोग यशस्वी ठरतील.

**मीन :** आज थोडी मानसिक अस्वस्थता जाणवू शकते. कोणावरही अति विश्वास ठेवू नका. आर्थिक बाबतीत सावध रहा. आध्यात्मिक विचारांकडे ओढ वाढेल.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रूपाली रवीन डांगे (अॅड.रूपाली मुकुंद कदम) (बी.एस.एल, एल.एल.बी, एमसीए) ४३७११/८५ यांनी मे.विक्रम मुद्रणालय, १०३ मेन रोड, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग ४१६६०२ येथे छापून १०३ मेन रोड, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध केले. मुख्य कार्यालय : दैनिक सिंधुदुर्ग समाचार, नरडवे चौक समोर, कणकवली जि.सिंधुदुर्ग वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही.
मालक, प्रकाशक आणि संपादक रूपाली रवीन डांगे (अॅड.रूपाली मुकुंद कदम) – ९८२२९७९७३२, कार्यालय संपर्क क्रमांक : ९८२२९७९७३२ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) संस्थापक कै.मुकुंद हरी कदम (एम.ए,एल.एल.बी)
This 'Daily Sindhudurg Samachar', Owner, Publisher by Rupali Ravin Dange (Adv.Rupali Mukund Kadam) BSL, LLB printed at Ms.Vikram Mudranalay, 103 Main Road, kankavli, Dist - Sindhudurg 416602, Published from 103 Main Road, kankavli, Dist - Sindhudurg 416602. The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper.
Owner, Publisher, Printer, Editor Rupali Ravin Dange (Adv.Rupali Mukund Kadam) Contact No. - 9822979732, Office Contact No. - 9822979732 (Responsible for selection of news under PRB ct.)
Email: sindhudurg.samachar@gmail.com Website: www.sindhudurgsamachar.in Facebook: sindhudurgsamacharlive, samacharhub Instagram: sindhudurgsamachar youtube: sindhudurgsamachar

## थोडक्यात

### महाराष्ट्र शासनाचे ३ हजार कोटींचे रोखे विक्रीस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने ९, १० आणि २० वर्षे मुदतीचे प्रत्येकी १,००० कोटी रुपयांचे एकूण ३,००० कोटींचे कर्जरोखे विक्रीस काढले आहेत. या तिन्ही रोख्यांच्या विक्रीतून मिळणारी रक्कम राज्यातील विविध विकास कामांसाठी अर्थपुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणार असल्याची माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे ९ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईतील फोर्ट येथील कार्यालयात या तिन्ही रोख्यांचा लिलाव होणार आहे. लिलावासाठीचे बिड्स ई–कुबेर प्रणालीद्वारे सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत स्पर्धात्मक बिड्स, तर १०.३० ते ११.०० वाजेपर्यंत अस्पर्धात्मक बिड्स सादर करता येणार आहेत. लिलावाचा निकाल त्याच दिवशी रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाणार आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार एकूण अधिसूचित रकमेपैकी १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी राखीव राहणार आहे. मात्र एका गुंतवणूकदारास कमाल १ टक्का रकमेपर्यंतच गुंतवणूक करण्याची मर्यादा असेल. ९ वर्षे मुदतीच्या रोख्यांचा कालावधी ३ डिसेंबर २०२५ पासून सुरू होऊन ३ डिसेंबर २०३४ रोजी पूर्ण होणार असून, त्यावर दरवर्षी ७.२० टक्के व्याज मिळणार आहे. व्याजाचे भुगतान दर सहा महिन्यांनी ३ जून व ३ डिसेंबर रोजी करण्यात येईल.

### म्हाडाकडून ४०२ घरांची सोडत जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या वतीने राज्यातील विविध उत्पन्न गटांसाठी एकूण ४०२ घरांची सोडत जाहीर करण्यात आली आहे. या सोडतीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे स्वत:च्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यास मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या घरांमध्ये कमी उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट तसेच उच्च उत्पन्न गट यांच्यासाठी विविध ठिकाणी घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मुंबई, ठाणे, रायगड, पुणे तसेच इतर काही भागांमध्ये ही घरे स्थित असल्याची माहिती म्हाडा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून इच्छुक नागरिकांनी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे, उत्पन्नाचा दाखला, अधिवासाचा पुरावा, आधार क्रमांक व बँक तपशील सादर करणे बंधनकारक आहे.

या सोडतीतील घरांच्या किमती स्थान, क्षेत्रफळ आणि उत्पन्न गटनुसार वेगवेगळ्या ठेवण्यात आलेल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरे मिळावीत, यासाठी शासन स्तरावर विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. तसेच या घरांसाठी विविध राष्ट्रीयकृत बँकांमार्फत गृहकर्ज उपलब्ध होणार आहे. सोडतीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने ऑनलाइन करण्यात येणार असून सर्व अर्जदारांना लाईव्ह ड्रॉ द्वारे निकाल पाहता येणार आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांना नियमानुसार पुढील प्रक्रिया पूर्ण करून घरांचे वाटप करण्यात येणार आहे. म्हाडाच्या या गृहनिर्माण योजनेमुळे भाडेतत्त्वावर राहणाऱ्या कुटुंबांना हक्काचे घर मिळण्याची मोठी संधी मिळाली असून नागरिकांकडून या सोडतीला मोठा प्रतिसाद अपेक्षित आहे.

# आर्थिक लोकशाही म्हणजे संधींची समानता -डॉ. अजित रानडे

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकशाही म्हणजे केवळ राज्यव्यवस्था नव्हे, तर जीवन जगण्याची एक पद्धत असून आर्थिक लोकशाही म्हणजे संधींची समानता असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांनी केले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली येथे महापरिनिर्वाणदिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित 'विचारवेध' व्याख्यानमालेतील 'आर्थिक लोकशाही आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. रानडे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथासह त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विचारांचे आजच्या काळातील महत्त्व स्पष्ट केले. शिक्षण, जमीन सुधारणा,




कामगारांचे हक्क, सामाजिक सुरक्षा यासारख्या क्षेत्रांतील बाबासाहेबांचे विचार आजही तितकेच सुसंगत असल्याचे त्यांनी विविध उदाहरणांतून मांडले.

''बाबासाहेब म्हणजे ज्ञानाचा नायगरा धबधबा,'' असे सांगत डॉ. रानडे यांनी त्यांच्या विचारांची दैनंदिन जीवनात



अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. स्वत:च्या बुद्धीला पटल्याशिवाय कोणतीही गोष्ट स्वीकारू नये, हे बाबासाहेबांचे तत्त्व प्रत्येकाने अंगीकारावे, असे ते म्हणाले.

समता, स्वातंत्र्य, बंधुता या लोकशाही मूल्यांबरोबरच कोणीही कनिष्ठ नाही ही भावना जपणं महत्त्वाचं आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. आर्थिक विषमता पूर्णपणे नाहीशी होणार नसली तरी ती किमान पातळीवर ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिक हा देशाचा प्रमुख घटक असल्याने बाबासाहेबांनी नागरिककेंद्रित संविधान दिले, असे सांगत संवैधानिक नैतिकतेचे पालन प्रत्येकाने करावे, असेही त्यांनी नमूद केले. कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, स्त्रियांना समान सामाजिक व आर्थिक संधी मिळाव्यात, सर्वांना समान अधिकार मिळावेत, तसेच संपत्तीच्या एकवटीकरणावर नियंत्रण असावे. असा बाबासाहेबांना अपेक्षित असलेला भारत डॉ. रानडे यांनी आपल्या व्याख्यानातून उलगडून दाखवला. याप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे, स्मारकाच्या सल्लागार संध्या अंबादे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त डॉ. शिंदे यांनी मनोगतात समाजाला विचारच प्रगतीकडे नेतात, असे सांगत 'विचारवेध' व्याख्यान मालिकेद्वारे समाजात विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले. स्मारक परिसरातील ग्रंथालय, विविध उपक्रम आणि मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने सुरू असलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार' पदविका अभ्यासक्रमातून समाजप्रबोधन आणि समाज उन्नती साधली जात असल्याचे त्यांनी सांगितले. या व्याख्यानाला रसिकांची भरगच्च उपस्थिती लाभली.

## बाबा आढावांच्या प्रकृतीची शरद पवारांनी केली विचारपूस





ज्येष्ठ समाजसेवक, सत्यशोधक विचारांचे प्रसारक आणि सेवाव्रती डॉ. बाबा आढाव हे उपचारासाठी पुण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल झाले आहेत. त्यांच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी रुग्णालयात भेट देत त्यांची विचारपूस केली.

यावेळी शरद पवार यांनी डॉ. बाबा आढाव यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी आणि त्यांना उत्तम आरोग्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली.

## ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत भव्य कार्यक्रम

## सामाजिक न्यायाची चळवळ बाबासाहेबांमुळे बळकट -राज्यपाल आचार्य देवव्रत



**मुंबई । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यपाल आचार्य देवव्रत उपस्थित होते. यावेळी राज्यपालांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत सामाजिक न्याय, समानता आणि संविधानाचे महत्व अधोरेखित केले.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले की, कोणत्याही राष्ट्रात युगपुरुष जन्माला आले की सामाजिक न्यायाची चळवळ अधिक बळकट होते. भारत हा विविधतेने नटलेला विशाल देश असून, अशा व्यापक देशात एकता, न्याय आणि समाजाची संघटित भावना दृढ करण्यासाठी संविधानाची निर्मिती करणे हे अत्यंत ऐतिहासिक आणि क्रांतिकारी कार्य होते. हे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिले, असे त्यांनी स्पष्ट केले. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हे देशातील सर्व समाजघटकांना समान अधिकार देणारे आणि त्यांना एकत्र बांधणारे आहे. त्यामुळेच भारताची लोकशाही अधिक सक्षम झाली आहे, असेही त्यांनी नमूद केले. एखादे महान व्यक्तिमत्त्व देहाने आपल्यातून गेले तरी त्यांचे विचार आणि कार्य जनतेच्या अंत:करणात सदैव जिवंत राहतात. म्हणूनच बाबासाहेब अमर आहेत, असे भावनिक उद्गार राज्यपालांनी काढले.

कठोर परिस्थितीतून शिक्षण घेत बाबासाहेबांनी संपूर्ण समाजाचा भविष्यकाळ बदलण्यासाठी शिक्षणालाच सर्वात मोठे शस्त्र मानले. एक सुशिक्षित व्यक्ती संपूर्ण कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य बदलू शकते, हा संदेश त्यांनी आपल्या आयुष्यातून दिला, असेही राज्यपालांनी सांगितले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बाबासाहेबांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा गौरव केला आणि संविधानामुळेच भारत एकसंध व लोकशाही राष्ट्र म्हणून उभा राहिला असल्याचे मत व्यक्त केले. मुंबईत आयोजित या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय प्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## ठाण्यात दिव्यांग कायदा कार्यशाळा

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यात दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ (RPWD Act 2016) अंतर्गत कलम ३९ नुसार दिव्यांग व्यक्तींबाबत संवेदनशीलता व जागरूकता निर्माण करण्यासाठी ५ डिसेंबर २०२५ रोजी बी. जे. हायस्कूल, कोर्ट नाका, ठाणे येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






प्रास्ताविकात जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी उज्वला सपकाळे यांनी दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण होणे किती आवश्यक आहे यावर भर दिला. दीपिका शेरखाने (दिव्यांग विभागप्रमुख, यशवंतराव चव्हाण सेंटर) यांनी राष्ट्रीय न्यास कायद्यावर मार्गदर्शन केले. तसेच विनित भागोजी आणि खुशी गणोत्रा यांनी RPWD Act 2016 आणि कलम ३९ संदर्भात सविस्तर माहिती दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्त्यांनी दिव्यांगांसाठी उपलब्ध सुविधांवर अनुभवाधारित चर्चा केली.कार्यक्रमास तहसीलदार संदीप थोरात, कृषी विभाग प्रमुख मुनीर बाचोटिकर, सहाय्यक सल्लागार संगीता शिर्के, सल्लागार ॲड. प्रमोद ढोकळे, अनिल कुऱ्हाडे (समग्र शिक्षा) यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन दीपक साळुंखे यांनी केले. शासकीय अधिकारी व विभागप्रमुखांना दिव्यांगांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्या हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि सर्वसमावेशक समाजनिर्मितीस चालना देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. ठाणे जिल्ह्यातील शासकीय कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व दिव्यांग क्षेत्रातील संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## सहकारी बँकांना झाले आहे तरी काय? पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न!



**मुंबई । विश्वनाथ पंडित**

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून लिहिलेल्या आणि अर्थतज्ञ विश्वास उटगी यांची प्रस्तावना लाभलेल्या बँकिंग तज्ञ मधु सदाशिव शिरोडकर लिखित सहकारी बँकांना झाले आहे तरी काय? या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच डीसीबी बँकेच्या वरिष्ठ अधिकारी सौ. पल्लवी बेळणेकर यांच्या हस्ते मुंबई येथे कौटुंबिक वातावरणात पार पडले.

यावेळी पुस्तकाचे लेखक मधु शिरोडकर मनोगत व्यक्त करताना म्हणाले बँक ऑफ इंडिया ही आपल्या लेखन कुशलतेची शिल्पकार असून, कुटुंबाने सर्वतोपरी मला स्वास्थ्य दिले त्यामुळेच हे पुस्तक माझ्याकडून पूर्ण झाले. सदर पुस्तक त्यांनी पत्नी कै. मनिषा यांना अर्पण केले आहे.

## ई-चलान तडजोड होणार नाही, १३ डिसेंबरच्या लोकअदालतीबाबत पोलिसांचे स्पष्ट आवाहन

**ठाणे । प्रतिनिधी**

येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी राज्यभर आयोजित करण्यात येणाऱ्या लोकअदालतीत ई–चलान प्रकरणांची कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही, असे स्पष्ट परिपत्रक अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहे.

सन २०२५ पासून प्रलंबित असलेल्या ई–चलान प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी वाहतूक विभागाकडून महाराष्ट्र राज्य विधी व सेवा प्राधिकरणाच्या मंजुरीने प्रयत्न सुरू आहेत. मात्र, आगामी लोकअदालतीत एकही ई–चलान प्रकरण तडजोडीसाठी ठेवले जाणार नाही, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, यूट्यूब, इंस्टाग्राम तसेच इतर सामाजिक माध्यमांवर १३ डिसेंबरच्या लोकअदालतीत ई–चलान दंडात सवलत मिळणार असल्याचा खोटा प्रचार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. या अफवांमुळे नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

ई–चलान तडजोड किंवा दंडात सवलत मिळेल, अशा सोशल मीडियावरील अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, तसेच कोणत्याही अनधिकृत लिंकद्वारे ई–चलानचा भरणा करू नये, असे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.

जर एखाद्या नागरिकाचे प्रकरण स्थानिक जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणाने तडजोडीसाठी ठेवले असेल, तर संबंधित न्यायालय किंवा स्थानिक वाहतूक पोलीस ठाण्याशी थेट संपर्क साधावा, असे मार्गदर्शन पोलीस अधीक्षक (मुख्यालय) सुनील भारव्दाज यांनी अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाच्या वतीने केले आहे.

# नवी मुंबईत उभारणार देशातील पहिली आयकॉनिक लाईव्ह एंटरटेन्मेंट अरेना

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या शहरी विकासाच्या वाटचालीत आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले जात असून देशातील पहिली आयकॉनिक मल्टीपरपज इंडोअर लाईव्ह एंटरटेन्मेंट अरेना नवी मुंबईत उभारण्यात येणार आहे. या भव्य प्रकल्पामुळे नवी मुंबई केवळ आर्थिक व औद्योगिक केंद्र म्हणून नव्हे, तर मनोरंजन, क्रीडा, सांस्कृतिक आणि जागतिक दर्जाच्या लाईव्ह इव्हेंट्सचे केंद्र म्हणून ओळखली जाणार आहे.

या अत्याधुनिक अरेनामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे संगीत मैफिली, लाईव्ह कॉन्सर्ट, क्रीडा स्पर्धा, प्रदर्शन, थिएटर, कॉर्पोरेट कॉन्क्लेव्ह, ई–स्पोर्ट्स स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव आणि मोठ्या प्रमाणावरील समारंभ आयोजित करता येणार आहेत. एका ठिकाणी बहुउद्देशीय वापरासाठी ही अरेना विकसित करण्यात येणार असल्याने ती २४ तास कार्यरत असणारे मनोरंजन केंद्र ठरणार आहे.

या प्रकल्पात आधुनिक साउंड सिस्टीम, एलईडी व्हिज्युअल वॉल्स, ऑटोमॅटिक लाईटिंग सिस्टम, मल्टीलव्हल पार्किंग, डिजिटल तिकिट प्रणाली, व्हीआयपी बॉक्स, मीडिया गॅलरी, फूड कोर्ट, सुरक्षा यंत्रणा, अग्निशमन व्यवस्था आणि हरित इमारत तत्त्वांनुसार पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना जागतिक दर्जाचा अनुभव नवी मुंबईतच मिळणार आहे. ही अरेना पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर एकाच वेळी हजारो प्रेक्षक बसू शकतील इतकी आसन क्षमता असणार आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, कोकण आणि विदर्भातूनही मोठ्या प्रमाणावर प्रेक्षक येथे आकर्षित होतील. याचा थेट परिणाम स्थानिक अर्थव्यवस्था, पर्यटन, हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा, इव्हेंट मॅनेजमेंट, तांत्रिक सेवा आणि रोजगारनिर्मितीवर मोठ्या प्रमाणावर होणार आहे.

या प्रकल्पामुळे हजारो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तंत्रज्ञ, कलाकार, व्यवस्थापन, सुरक्षारक्षक, स्वच्छता कर्मचारी, वाहतूक सेवा, फूड इंडस्ट्री आणि डिजिटल



मार्केटिंगसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. तज्ज्ञांच्या मते, ही अरेना उभारल्यानंतर मुंबईवरील गर्दीचा ताण कमी होण्यास मदत होणार असून नवी मुंबई स्वतंत्रपणे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मनोरंजन केंद्र म्हणून उदयास येईल. तसेच आंतरराष्ट्रीय कलाकार, क्रीडापटू आणि मोठे प्रॉडक्शन हाऊस नवी मुंबईकडे आकर्षित होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून मराठी कला, लोककला, नाटक, संगीत, नृत्य आणि चित्रपट क्षेत्राला मोठे व्यासपीठ मिळणार आहे. स्थानिक कलाकारांना जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे.

शहरी नियोजनाच्या दृष्टीने ही अरेना वाहतूक सुलभता, रेल्वे कनेक्टिव्हिटी, मेट्रो मार्ग, महामार्ग आणि विमानतळाशी संलग्नता लक्षात घेऊन उभारली जात आहे. त्यामुळे देश–विदेशातील पाहुण्यांना येथे पोहोचणे अत्यंत सोयीचे ठरणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबईच्या नागरिकांसाठी तो अभिमानाचा ठेवा ठरणार असून, महाराष्ट्राच्या विकास नकाशावर नवी मुंबईचे स्थान अधिक ठळक होणार आहे. उद्योग, व्यापार, मनोरंजन आणि संस्कृती यांचा संगम साधणारा हा प्रकल्प नवी मुंबईचे भविष्य बदलणारा मैलाचा दगड ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## थोडक्यात

### भरणे येथील कोंडीचा फटका पालकमंत्र्यानाही



**रत्नागिरी । प्रतिनिधी**

पालकमंत्री उदय सामंत हे शुक्रवारी सकाळी भरणे येथून खेडच्या दिशेने प्रवास करत असताना त्यांच्या ताफ्याला वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. मंत्र्यांचा दौरा असल्यास ताफा विनाअडथळा मार्गस्थ व्हावा यासाठी विशेष व्यवस्था केली जातेय मात्र या वेळी अशी कोणतीही प्रभावी व्यवस्थाच नसल्याचे दिसून आले. खेड-भरणे राज्य महामार्गावर सध्या रस्त्याचे काम सुरू असून भरणे परिसरात खोदकाम करण्यात आले आहे. त्यामुळे एकाच मार्गावरून दुहेरी वाहतूक सुरू असल्याने गेल्या काही दिवसांपासून येथे वाहतूक कोंडीची समस्या अधिक तीव्र झाली आहे. रस्त्यावर जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, शिवसेना उपनेते संजय कदम यांच्या अभिष्टचिंतनासाठी उदय सामंत खेडच्या दिशेने जात असताना त्यांचा ताफा या कोंडीत अडकला. ताफ्यातील पोलीस यंत्रणांची परिस्थिती हाताळताना चांगलीच धावपळ झाली. एसटी बसेसही या कोंडीत अडकल्याने महामार्गावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या. या घटनेमुळे भरणे येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न किती गंभीर आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून रस्ते कामाची गती वाढवून तातडीने वाहतूक सुरळीत करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेचा विश्वविक्रम

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राने 'मागेल त्याला सौर कृषीपंप' या योजनेत ऐतिहासिक कामगिरी करत एका महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषीपंप बसविण्याचा विश्वविक्रम केला आहे. या विक्रमाची अधिकृत नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली असून, याबाबतचा प्रमाणपत्र सोहळा शेंद्रा एमआयडीसीतील ऑरिक सिटी मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा सन्मान स्वीकारण्यात आला.




या वेळी गिनीज बुकचे प्रतिनिधी कार्ल सॅविले यांनी विक्रमाची औपचारिक घोषणा केली. विक्रमासाठी आवश्यक असलेले ३५ हजार पंप ओलांडून राज्याने तब्बल ४५ हजारांहून अधिक पंप बसविल्याने हा जागतिक विक्रम ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सौर ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी १६ हजार मेगावॅट स्वतंत्र वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे प्रदूषणमुक्त वीज उपलब्ध होईल आणि इतर वापरासाठीची वीज स्वस्त दरात मिळू शकेल. त्यामुळे भविष्यात दरवर्षी ३ टक्के दरकपात करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यात आजपर्यंत ७ लाखांहून अधिक सौर कृषीपंप बसविण्यात आले असून, पुढील वर्षभरात ही संख्या १० लाखांवर नेण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. मराठवाड्याचा यामध्ये मोठा वाटा असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातच १४ हजार पंप बसविण्यात आले आहेत.

या योजनेमुळे ऊर्जाक्षेत्रास चालना मिळाली असून सौर उपकरण निर्मिती, देखभाल व सेवा क्षेत्रात सुमारे एक लाख रोजगार निर्माण झाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्र देशात सौर ऊर्जेच्या वापरात आघाडीवर असल्याचे यामुळे पुन्हा सिद्ध झाले आहे.

# महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्या राज्यस्तरीय 'दर्पण' पुरस्कारांची घोषणा

**फलटण । प्रतिनिधी**

मराठी वृत्तपत्रसृष्टीत सलग ३४ वर्षे पत्रकारिता करणारे आणि त्यानंतर पुणे पत्रकार प्रतिष्ठान, पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिट्यूट (पत्रकारिता प्रशिक्षण) मध्ये कार्यरत असणारे ज्येष्ठ पत्रकार श्री. राजीव साबडे (पुणे) यांना सन २०२५ चा महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचा 'विशेष दर्पण' पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र बेडकिहाळ यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली.

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीतर्फे मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२५ चे राज्यस्तरीय 'दर्पण पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. त्यामध्ये राजीव साबडे यांच्यासह नांदेड येथील दैनिक प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे, गेली १५ वर्षे धाडसाने महाराष्ट्र – कर्नाटक सीमेवर साहित्य व पत्रकार संमेलने घेणारे मसूर, जि. सातारा येथील 'गुंफण'चे संपादक बसवेश्वर चेणगे, सलग ३२ वर्षे दैनिक 'पुढारी'च्या माध्यमातून पत्रकारिता करणारे सातारा येथील जीवनधर चव्हाण, महाराष्ट्र राज्य अधिस्विकृती समितीचे सदस्य तथा श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथील दैनिक 'स्नेहप्रकाश'चे संपादक प्रकाश कुलथे, दैनिक 'लोकमत'चे माणगाव, जि. सिंधुदुर्ग येथील पत्रकार विजय पालकर, अहिल्यानगर येथील दैनिक 'नगर टाईम्स'चे कार्यकारी संपादक




श्रीराम जोशी, यवतमाळ जिल्ह्यातील दैनिक 'सकाळ'चे उमरखेड शहर प्रतिनिधी डॉ. अनिल काळबांडे, कोल्हापूर येथील मँगो एफ.एम. रेडीओ प्रसारण केंद्राचे केंद्रप्रमुख तथा साप्ताहिक 'वर्तमान' चे संपादक आशिष कदम यांचा समावेश आहे.

यावर्षापासून विशेष बाब म्हणून राज्यातील माहिती व जनसंपर्क विभागातील उत्कृष्ट शासकीय व अन्य क्षेत्रातील प्रभावी वृत्तांकन लेखन करणारे अधिकारी यांचेमधून एकाची 'दर्पण' पुरस्कारासाठी निवड करण्याचा निर्णय संस्थेने घेतला आहे. त्यानुसार यावर्षीचा असा पहिलाच 'दर्पण' पुरस्कार पुणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांना देण्यात येणार आहे.

रोख रक्कम, शाल, पुष्पगुच्छ, आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचा चरित्र ग्रंथ व विशेष सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या सर्व पुरस्कारप्राप्त पत्रकारांना ६ जानेवारी २०२६ च्या राज्यस्तरीय पत्रकार दिनादिवशी 'दर्पण' कार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या पोंभुर्ले, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग या जन्मगावी संस्थेने उभारलेल्या 'दर्पण' सभागृहात एका विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार असल्याचेही रविंद्र बेडकिहाळ यांनी पत्रकात नमूद केले आहे.

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे उपाध्यक्ष बापूसाहेब जाधव, कृष्णा शेवडीकर, कार्यकारी विश्वस्त विजय मांडके यांनी या सर्व पुरस्कारप्राप्त पत्रकारांचे अभिनंदन केले आहे.

# पाच दिवसीय पारंपरिक डाळपस्वारी वारीला उत्सवाची भव्यता लाभणार

## १३ डिसेंबर २०२५ : डाळपस्वारीचा पहिला दिवस

**देवगड। प्रतिनिधी**

**शतकानुशतके जोपासली गेलेली आध्यात्मिक परंपरा उजळून मिठबाव श्री देव रामेश्वर पाच दिवसीय डाळपस्वारी २०२५ चे औपचारिक वेळापत्रक घोषित करण्यात आले आहे. १३ ते १७ डिसेंबरदरम्यान भक्तीमय वारी, वयक्तिक न्याय (मेळे), देवतरंग आणि सेवक भेटींच्या धार्मिक वातावरणात पंचक्रोशीतून हजारो भाविक सहभागी होणार आहेत. उत्सव समितीने संपूर्ण कार्यक्रमपत्रिका जाहीर केली असून यंदाची वारी अधिक भव्यतेने पार पडण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.**



पहाटे ६.३० वाजता श्री देव रामेश्वर मंदिरात गावघर १२/५ देव सेवकांच्या उपस्थितीत प्रारंभ होईल. सकाळी ८ वाजता श्री देव रामेश्वर मंदिरातून प्रस्थान होऊन कुलस्वामी मंदिर जोगलवाडी, देऊळवाडी भवांडा, पडळी, गोलतकर ब्राह्मणस्थळ अशा पारंपरिक स्थळी भेटी घेतल्या जातील. दुपारी १ वाजता उत्कटवाडी गणेश मंदिरात भोजनानंतर सायंकाळी फाटक मंदिर भेट, चौगुले सेवक भेट, खाडिलकर महाजन भेट असे कार्यक्रम होतील.रात्री ९ वाजता सुभेदार सेवक भेट व भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. रात्री ११ वाजता झाडाखाली स्थिर होऊन विश्रांती व मुक्काम असेल.

१४ डिसेंबर २०२५ -डाळपस्वारीचा दुसरा दिवस या दिवशीही वैयक्तिक न्याय (मेळे) होतील. सकाळी ८ वाजता प्रस्थानानंतर विठ्ठल–रखुमाई मंदिर, डाळप खळ्यावर भेट (भंगसाळ), म्हसेश्वर (खुरणी) .तांबळडेग विठ्ठल रुखुमाई मंदिर भेट,तांबळडेग संपूर्ण गाव रयतेतर्फे विठ्ठल रखुमाई मंदिरात भोजन व्यवस्था असेल.यानंतर दक्षिणवाडा, उत्तरवाडा, वेताळ खुरणी, डगरेवाडी कुलस्वामी मंदिरात भेट रात्री डगरेवाडी ग्रामस्थांच्या वतीने कुलस्वामिनी मंदिरात भोजन होऊन देवतरंग गजबादेवी मंदिरात स्थिर होऊन मुक्काम असेल. १५ डिसेंबर रोजी एकादशी असल्याने या दिवशी सर्व तरंग-साज गजबादेवी मंदिरातच थांबणार आहेत. गावघरातील वयक्तिक न्याय सकाळी १० वाजता सुरू होतील.

१६ डिसेंबर २०२५ - डाळपस्वारीचा चौथा दिवस यादिवशी मेळे वैयक्तिक न्याय मेळे होणार नसून सकाळी ६.३० वाजता गजबादेवी मंदिरातून प्रस्थान होईल.कातवण स्मशानातील खुरणी, खोत सेवक भेट, कातवणकर सेवक भेट, महापुरुष कातवण भेटी झाल्यानंतर गावहोळी येथे भेट ,केळया येथे खुरणी झाल्यावर श्री निलराज लोके यांच्या वतीने भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारी गोगटेतळे भेट, मिठबाव वेस भेट विधी, सोमण (उपाध्या) व काळे महाजन भेट, बाराचा पूर्वस सुतारवाडी भेट आणि पुढे देवी काळंबादेवी भेट होईल.रात्री देवी सातेरी येथे मुक्काम असून घाडी बंधूंच्या वतीने जेवणाची सोय केली आहे. १७ डिसेंबर २०२५ : डाळपस्वारीचा अंतिम दिवस यादिवशी वैयक्तिक न्याय वेळेच्या नियोजनानुसार घेतले जातील. सकाळी ७ वाजता देवी सातेरीकडून प्रस्थान होऊन म्हारकी (खुरणी), मयेकर मूळघर, नाडकर्णी जमेदार, बिर्जे मूळघर, वाडेकर, शेटये मूळघर भेटी होणार आहेत.नंतर नाचणकर सेवक भेट व नाचणकर परिवाराच्या वतीने दुपारी भोजन व्यवस्था आहे.यानंतर पोतदार, मिठबावकर, राणेवाडी येथील बाराची तुळस भेट घेतली जाईल.रात्री लोके कुलस्वामिनी मंदिरात भेट व लोके बंधूंकडून भोजन व्यवस्था असेल.यानंतर गुरव सेवक भेट, पुजारे मूळ घर भेट, १२६५ मांडावर (घाडी घर) येथे भेट होईल.मध्यरात्री श्री देव रामेश्वर मंदिरात पारंपरिक समारोप होऊन डाळपस्वारीची सांगता होईल.

# संदिप भाई पारकर स्मृती रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद
## चिंदर सेवा संघाचे आयोजन, ३४ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**आचरा । विवेक परब**

चिंदर येथील श्री देवी भगवती वार्षिक यात्रौत्सवाचे औचित्य साधून भगवती मंगल कार्यालय चिंदर येथे चिंदर सेवा संघ आयोजित कै. संदिप भाई पारकर स्मृती रक्तदान शिबीराला आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रारंभी चिंदर सेवा संघ उपाध्यक्ष विवेक परब, सल्लागार भाई तावडे, संतोष अपराज, वैद्यकीय डॉ भारती ठोंबरे, नर्सिंग ऑफिसर निता आरोलकर यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.

चिंदर सेवा संघ गेलें सहा वर्ष रक्तदान शिबीर घेत असून अनेक व्यक्तीचा जीव वाचवण्यासाठी या रक्तदान शिबिरात घेण्यात आलेल्या रक्ताचा उपयोग झाला आहे असे यावेळी बोलताना कार्यवाह सिध्देश गोलतकर म्हणाले, तर पी. एस. आय विलास टेंबुलकर, कॉन्स्टेबल अमित हळदणकर, सोसायटी चेअरमन देवेंद्र हडकर, ग्रामपंचायत सदस्य दिपक सुर्वे, संदिप परब, नंदिनी पावसकर, सुनंदा अपराज, गुरु जावकर, अश्विनी पाताडे, संजय हडपी, डॉ. विवेक घाडगे, आत्माराम नाटेकर, विलास परब, गुरुनाथ नाटेकर, पोलिस पाटील दिनेश पाताडे, मंगेश नाटेकर, अरविंद घाडी, बाबरी गांवकर आर्दीनी



रक्तदान शिबिराला शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक, सूत्रसंचालन, समारोप सिद्धेश गोलतकर यांनी केला. रक्तदान शिबिरात भूषण नारायण पाताडे, दिपक रामचंद्र तावडे, गोविंद धोंडू गांवकर, याज्ञिक दिनेश पाताडे, अनिल पांडुरंग चिंदरकर, प्रथमेश शंकर अपराज, आशिष चंद्रशेखर कोरगांवकर, तुषार विष्णू बेहेरे, पराग राजेंद्र शिरसाट, वरद संजय जोशी, विजय धाकू घाडी, ओमकार कृष्णा आचरेकर, तेजल सुरेंद्र मुळे, दत्ताराम मनोज सावंत, शंकर सदानंद पालकर, दत्तात्रय महादेव जाधव, सागर मनोहर नाटेकर, विश्वनाथ लोकेगांवकर, प्रसाद प्रताप पडवळ, सागर सत्यवान चव्हाण, निलेश विजय रेवडेकर, ललित चंद्रकांत घाडीगांवकर, दिलीप सहदेव गोसावी, श्रेयस दिपक सावंत, अमर मगर, भूषण अरविंद दत्तदास, नारायण संजय पाताडे, संतोष शामराव गोसावी, रुपेश केशव पडवळ, विजय दशरथ पवार, गिरीश पवार, शिशिर चंद्रशेखर पालकर, ओंकार तावडे, विनम्र सुहास चिंदरकर, सागर घाडी या चौतीस रक्तदात्यांनी रक्ताचे पुण्यदान केले. तर दिपक अनंत मांडवकर, दिनेश अनंत आर्वेकर, अभय आनंद पाडावे, पूनम संदिप पारकर, सानिका सुरेंद्र मुळे, रोहन शंकर गांवकर, रामचंद्र विठ्ठल परब, जगन्नाथ घाडी, ओमकार वळंजू, संपदा अपराज, संतोष पडवळ यांनी सहभाग दर्शवला.

रक्तदात्यांना भाजप तालुकाध्यक्ष धोंडी चिंदरकर व संतोष गांवकर यांच्या वतीने देण्यात आलेली भेट वस्तू आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. शिबिर यशस्वी करण्यासाठी भाई तावडे, खजिनदार गणेश गोगटे, कार्यवाह सिध्देश गोलतकर, आशिष कोरगांवकर, निशांत पारकर, संतोष अपराज, रावजी तावडे, मारुती हडकर, रोहन वराडकर, शंकर पालकर, पिंट्या दळवी, प्रसाद टोपले आर्दीनी मेहनत घेतली. चिंदर सेवा संघाच्या वतीने रक्तदात्याचे आभार मानण्यात आले.

# व्यायामाचे आरोग्यावर फायदे आणि जीवनासाठी महत्व

**किशोरवयीन मुलांनी रोज किमान ६० मिनिटे मध्यम ते तीव्र शारीरिक क्रियाकलाप करणे आवश्यक आहे. व्यायामाचा फायदा केवळ शरीराला नाही तर मनालाही होतो.**

**मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य व्यायाम मेंदूच्या आरोग्यासाठी खूप उपयुक्त आहे आणि शिकण्याची क्षमता वाढवतो. नियमित व्यायाम केल्याने झोप सुधारते आणि शरीर आपले 'सुखदायक रसायने' तयार करते, ज्यामुळे आनंद आणि समाधानाची भावना निर्माण होते. व्यायाम नैराश्य कमी करतो आणि चिंता कमी करण्यास मदत करतो. नवीन नृत्य किंवा १०० मीटर धाव यांसारख्या उद्दिष्टे साध्य केल्यावर आत्मसंतोष आणि अभिमानाची भावना देखील निर्माण होते.**

**शारीरिक स्वास्थ्य**

व्यायामामुळे वजन नियंत्रित राहते आणि काही गंभीर आजारांची शक्यता कमी होते. नियमित व्यायामामुळे वजन वाढ टाळता येते, टाइप २ मधुमेह, हृदयविकार व उच्च रक्तदाबाची जोखीम कमी होते. हाडे मजबूत करण्यासाठी उडी मारणे, धावणे किंवा वजन उचलणे यासारखे व्यायाम उपयुक्त आहेत.

**वृद्धापकाळात फायदे**

व्यायामामुळे वृद्धापकाळात जीवनाची गुणवत्ता सुधारते. नियमित व्यायाम मेंदूला निरोगी ठेवतो आणि अल्झायमर सारख्या आजाराची जोखीम कमी करतो. तसेच, पडल्यामुळे होणारे जखमा टाळण्यासाठीही व्यायाम महत्त्वाचा आहे.

**व्यायामाचे प्रकार**

संतुलित व्यायामामध्ये तीन भाग असतात
एरोबिक व्यायाम
स्नायू–शक्ती वाढविणारा व्यायाम
लवचिकता वाढविणारे व्यायाम

**एरोबिक व्यायाम कसा करावा?**

एरोबिक व्यायाम म्हणजे हृदय आणि फुफ्फुसाला चालना देणारा व्यायाम. नियमितपणे हा व्यायाम केल्यास हृदय आणि फुफ्फुस मजबूत होतात आणि शरीराच्या सर्व भागात ऑक्सिजन पोहोचवण्याची क्षमता सुधारते.



टीम खेळ खेळणाऱ्या मुलांना सरावाच्या दिवशी ६० मिनिटांपेक्षा जास्त मध्यम ते तीव्र व्यायाम होतो. बास्केटबॉल, फुटबॉल, हॉकी, रॉइंग यांसारखे खेळ उत्कृष्ट एरोबिक व्यायाम देतात. जर तुम्ही टीम खेळत नसाल तरही चालणे, धावणे, पोहणे, नृत्य, सायकलिंग, टेनिस, हायकिंग यांसारख्या क्रियाकलापांनी एरोबिक व्यायाम मिळतो.

**स्नायू–शक्ती वाढविणारा व्यायाम**

केवळ हृदय नाही तर शरीरातील इतर स्नायूंना देखील व्यायाम आवश्यक आहे. स्नायूंना व्यायाम दिल्यास ते मजबूत होतात आणि सांधे सुरक्षित राहतात.

**हाताचे स्नायू:** रोइंग, क्रॉस–कंट्री स्कीइंग, पुश–अप्स, पुल–अप्स

**पायाचे स्नायू:** धावणे, सायकलिंग, स्केटिंग, स्क्वॅट्स

**केंद्रीय स्नायू:** रोइंग, योग, पिलाटेस, प्लँक, क्रंचेस

**लवचिकता वाढविणे**

शरीर लवचिक ठेवणे हीसुद्धा व्यायामाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. लवचिकता वाढविल्याने खेळात कामगिरी सुधारते. डान्स, मार्शल आर्ट्स, जिमनॅस्टिक्स आणि योग हे लवचिकता वाढवणारे व्यायाम आहेत. व्यायामानंतर स्ट्रेचिंग केल्यास लवचिकता अधिक सुधारते.

**व्यायाम सतत कसा टिकवावा?**

व्यायामाचे प्रमाण टिकवणे कठीण होते कारण बऱ्याच लोकांना व्यायामात रस येत नाही. त्यामुळे वेगवेगळ्या खेळांमध्ये किंवा क्रियाकलापांमध्ये भाग घेऊन मजा अनुभवणे आवश्यक आहे. मित्रांसोबत व्यायाम करणे, कोच किंवा फिटनेस एक्स्पर्टचा सल्ला घेणे उपयुक्त ठरते. व्यायामाच्या आरोग्यदायी फायद्यांचा विचार करता, दररोज हालचाल करणे आणि जास्त वेळ बसून राहणे टाळणे अत्यंत फायदेशीर आहे. आरोग्याची काही समस्या असली तरी, डॉक्टरांचा सल्ला घेऊन सुरुवात करता येते. छोट्या गोष्टीसुद्धा व्यायाम मानल्या जातात कृ लहान सायकल चालवणे, कुत्रा घालायला नेणे, पाने साफ करणे यांसारखे कामसुद्धा व्यायामात मोजले जातात. नवीन लोकांनी दिवसातून काही मिनिटे व्यायाम करण्यापासून सुरुवात करावी आणि हळूहळू ६० मिनिटांपर्यंत पोहोचवावे.